# महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर

## राज्यशास्त्र विभाग

## मा. राजू शेट्टी भेट आणि मुलाखत

## अहवाल

बी. ए. भाग तीन राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास भेट गुरुवार, दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिरोळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजू शेट्टी यांची भेट आणि मुलाखत घेऊन अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.

या अभ्यासभेटीत मा. राजू शेट्टी यांनी त्यांचा शेतकरी चळवळीतील प्रवेश कसा झाला याचे विश्लेषण केले. ते म्हणाले, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शेती करीत असताना शेतमालाला उत्पादन खर्चापेक्षा कमी बाजारभाव मिळतो त्यामुळे शेती आणि शेतकरी तोट्यात जातो हे लक्षात आले. त्यामुळे मी शेतीप्रश्नाचा बारकाईने अभ्यास करू लागलो आणि शेतकरी चळवळीचे नेते मा. शरद जोशी यांच्या विचाराने प्रभावित होऊन शेतकरी चळवळीत प्रवेश केला. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी केवळ रस्त्यावर संघर्ष करून चालणार नाही तर शेतीविषयी धोरण जेथे निर्धारित होते त्या राज्याच्या विधिमंडळात प्रवेश घटला पाहिजे या भूमिकेतून मी राजकारणात प्रवेश केला आणि २००४ साली शिरोळ विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली आणि निवडून आलो. २००४ ते २००९ या पाच वर्षात विधानसभेत जे प्रश्न उपस्थित केले, जे लढे उभारले आणि त्याचे यशापयश यांची माहिती त्यांनी विस्ताराने दिली.

त्यानंतर लोकसभा निवडणूक आपण का लढविली हे स्पष्ट करताना ते म्हणाले, शेती हा प्रश्न केंद्रसुचीमध्ये असल्यामुळे केंद्र सरकार आणि संसदेला शेती प्रश्नावर राज्य शासनापेक्षा अधिक अधिकार असल्यामुळे तेथे शेतकऱ्यांचा आवाज उठवण्यासाठी आपण लोकसभेची २००९ ची निवडणूक हातकणंगले लोकसभा मतदार संघातून लढविली व शेतकरी आणि सर्वसामान्य मतदारांच्या पाठींब्यावर निवडून आलो. त्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अनेक समविचारी पक्षांशी चर्चा करून संसदेत आवाज उठविला. २००९ ते २०१४ आणि २०१४ ते २०१९ ता दहा वर्षांच्या लोकसभा सदस्यत्वाच्या काळात केलेल्या कामाचा त्यांनी विस्ताराने आढावा घेतला.

त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी त्यांना संसदेतील कामकाज, संसदीय आयुधे, राष्ट्रीय राजकारणातील महत्वाचे प्रश्न, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, भारत जोडो यात्रा आणि २०२४ ची लोकसभा निवडणूक यावर अनेक प्रश्न विचारून त्यांचे मत समजावून घेण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबरच विद्यार्थ्यांनी त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणातील सद्यस्थिती, थासळत चाललेली राजकीय नैतिकता, घराणेशाही, विधीमंडळातील

घडामोडी  विषयीही अनेक प्रश्न विचारले आणि त्यांनी त्यांना विस्ताराने चर्चा केली. हा संवाद जवळजवळ दोन तास झाला. या अभ्यास भेटीत एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शेवटी कॉलेज आणि विद्यार्थ्यांच्या वतीने डॉ. अंगद पाटील यांनी आभार मानले.

राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजू शेट्टी यांची भेट



राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजू शेट्टी यांची भेट  व स्वागत



राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजू शेट्टी यांची भेट





राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजू शेट्टी यांची भेट व चर्चा




राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजू शेट्टी यांची भेट व चर्चा

